विरूध्द पक्षातर्फे साक्षीदार क्र.१

फौजदारी किरकोळ
अर्ज क्र.५१०/२०१८
प्रियंका विरूध्द लोकेश
निशाणी – ७

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

**उलटतपास अर्जदार तर्फे वकील श्री. कुशवहा यांच्या मार्फत सुरू**

८. माझ्या मुलीचे नाव आराध्या आहे. तीचे वय १० वर्षे आहे. ती अर्जदार सोबत राहते. ती शाळा शिकत आहे. ती इयत्ता ४ थी मध्ये नागपूर येथे शिकत आहे. मी मुलीकडे कधी कधी भेटायला जातो. ती कशाने शाळेला जाते, ती सांगत असते. मी मुलीला शाळेसाठी पैसे देत नाही. मुलगी माझ्या जवळ राहत नसल्याने तिला सांभाळण्याची माझी जबाबदारी नाही. हे म्हणणे खरे आहे की मुलीचा सर्व खर्च अर्जदार व तिची आई करते. अर्जदारचे वडील मयत झाले आहे. अर्जदाराचे वडील काम करत होते. मात्र ते एकटेच घर खर्च चालवत होते याची मला माहिती नाही. अर्जदाराच्या घरी आणखी कोणी कमविते का याची मला माहिती नाही. अर्जदाराची आई घरकाम करते. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार काहीही काम करत नाही. साक्षीदार सांगातो की ती टयूशन घेते व शाळेत शिकवायला जाते. ती शिकवायला जात असल्याबाबत व टयुशन घेत असल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.

९. मी सध्या काम मिळाले तर करतो. मी शारिरीक दृष्टया सदृढ आहे. हे म्हणणे खरे आहे की अर्जदाराने दुसरे लग्न केले नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार माझ्यासोबत राहत असताना मी व माझे आईवडील तिला त्रास देत होते. अर्जदार १० वर्षापासून माझ्यापासून वेगळी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराने माझ्याकडे नांदायला यावे म्हणून मी कधीही केस दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार व तिच्या मुलीला सांभाळण्याची जबाबदारी माझी आहे. माझ्यावर दुसरी कोणतीही जबाबदारी नाही. मी भंडारा येथे राहत आहे. तेथे माझे स्वत:चे घर आहे. मला शेती नाही. माझे घर ९०० चौफूट आहे, ते पक्के बांधकाम आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा जबाब दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.10 16:40:40 +0530

कामठी
दिनांक १०/०४/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी